स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७

**प्रो. (डॉ.) सदानंद भोसले**
एम्.ए., पीएच्.डी.
**संचालक** (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०-२५६२२६८८/८९
: ०२०-२५६२२६९०/९१
: ०२०-२५६२२६९२
: ०२०-२५६९७३४१

**संदर्भः रासेयो/२०२५-२६/६३** **दि.१०/०६/२०२५**

**प्रति,**
**मा. प्राचार्य/संचालक**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
**रासेयो संलग्नीत महाविद्यालये व परिसंस्था**
**फक्त पुणे शहर व पिंपरी-चिंचवड**

**विषय : २१ जून, २०२५ जागतिक योग दिनानिमित्त पुणे ते पंढरपूर दिंडीमध्ये सहभागी वारकऱ्यांसाठी 'भक्तियोग' उपक्रम मार्गदर्शन बैठकीस उपस्थित राहणेबाबत**

महोदय,

पुणे ते पंढरपूर विठोबाची वारी हे महाराष्ट्राचे सांस्कृतिक आणि अध्यात्मीक वैभव आहे. या वर्षी संत ज्ञानोबा आणि संत तुकोबा यांच्या दिंडीचा मुक्काम पुणे शहरामध्ये दि. २० व २१ जून २०२५ रोजी असणार आहे. २१ जून हा जागतिक योग दिन म्हणून मा. प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून मूर्त झाला असून, ह्या जागतिक योग दिनाचे हे ११ वे वर्ष आहे.

२१ जून जागतिक योग दिनाचे औचित्य साधुन राज्याचे मा. उच्च व तंत्र शिक्षणमंत्री नामदार श्री. चंद्रकांतदादा पाटील यांच्या संकल्पनेतून ह्या वर्षी २१ जून रोजी 'भक्तियोग' ह्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन वारीतील वारकऱ्यांसोबत करण्याचे आयोजिले आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे महानगरपालिका आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हे आयोजन संपन्न होणार आहे.

वरील आयोजनासाठी दि. १४/६/२०२५, शनिवार रोजी सायंकाळी ५.०० वाजता इरावती कर्वे शैक्षणिक संकुल येथील सभागृहामध्ये मा. नामदार श्री. चंद्रकांतदादा पाटील, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा.डॉ. सुरेश गोसावी, कुलगुरू, मा.डॉ. पराग काळकर, प्र-कुलगुरू, मा.डॉ.सीएमए चारूशिला गायके, प्रभारी कुलसचिव, मा.श्री. राजेश पांडे, सदस्य, राज्य सल्लागार समिती, रासेयो यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक आयोजित केलेली आहे.

तरी सदर मार्गदर्शन बैठकीस आपल्या महाविद्यालयातील **एकक निहाय कार्यक्रम अधिकारी व २ रासेयो स्वयंसेवक यांनी दिनांक १४ जून, २०२५ शनिवार रोजी सायं. ५.०० वाजता, इरावती कर्वे संकुलातील सभागृह, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ** येथे अनिवार्यतः उपस्थित रहावे. सहभागी स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकाऱ्यांचा प्रवासखर्च नियमित कार्यक्रमातून करण्यात यावा. कळावे, ही विनंती.

**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**

**नावनोंदणी :** दिनांक १३/०६/२०२५ पर्यंत एकक निहाय कार्यक्रम अधिकारी व २ स्वयंसेवकांची नावनोंदणी करणे आवश्यक आहे.
**नावनोंदणी लिंक :**
https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSekmuBzrvaRaZ0RUV53Ay1vRGgXcFm5u4KHTOnddV_ZIXXisg/viewform?usp=sharing&ouid=107131124500957130754